# चोरीच्या १५ मो.सा.सह दोघांना अटक

## साहित्याच्या हेराफेरीचे गोदामच आढळले

लातूर: लातूर शहर पोलिसांना नेहमीच्या गाड्या तपासणीवेळी एक तरुण हाती लागला. त्याची अधिक चौकशी करता चोरीच्या मोटारसायकलींची हेराफेरी करणे, मोटारसायकलींची विल्हेवाट लावणे यासाठीचे गोदामच हाती लागले असून पोलिसांनी या प्रकरणात चोरीच्या १५ मोटारसायकलीसह दोघांना सज्ञान व्यक्तींना अटक केली आहे तर एका अल्पवयीन मुलास ताब्यात घेतले आहे. या घटनेतून जिल्हा व परिसरातील अनेक मोटारसायकल चोरीतील गुन्हे उघडकीस येतील अशी आशा शहर पोलीस उपअधिक्षक मंगेश चव्हाण यांनी व्यक्त केली आहे.



मोटारसायकल तपासणीच्यावेळी लातूर शहरामध्ये स्वतः मंगेश चव्हाण यांनी सर्फराज उस्मान शेख रा. इस्लामपूरा हा हाती लागला. त्याची अधिक चौकशी करता चोरीच्या मोटारसायकली लातूर शहरातील शाहू चौक भागातील भगवान सर्व्हीस सेंटरमध्ये विकल्या जायच्या, त्या ठिकाणी मोटारसायकलीच्या साहित्याची अदलाबदल करून बसविले जायचे व त्या मोटारसायकलच्या कागदपत्रावर या वाहनाची खरेदी-विक्री होत असते. या प्रकरणात पोलिसांनी गॅरेजमालक भगवान गायकवाड रा. श्रीकृष्ण नगर यास व सर्फराज शेख रा. उस्मानपुरा लातूर यास अटक केली आहे. तर एका अल्पवयीन मुलास ताब्यात घेतले आहे. हे मोठे रॅकेट असण्याची शक्यता आहे.

लातूर शहर व जिल्हा परिसरातील मोटारसायकली चोरून त्या भगवान सर्व्हिस सेंटरमध्ये साहित्याची अदलाबदल करून विकल्या जात असत. आज पोलिसांनी या तिघांकडून १५ मोटारसायकली जप्त केल्या आहेत. या मोटारसायकलींमध्ये बजाज पल्सर, हिरो होंडा, टीव्हीएस, व्हिक्टर आदीसारख्या कंपनीची वाहने आहेत. लातूर जिल्हा, नांदेड, परभणी, पुणे एवढेच नव्हे तर एक मोटारसायकल रत्नागिरी जिल्ह्यातून चोरल्याचे निष्पन्न झाले आहे. या चोरट्यांकडून आणखी चोरीच्या मोटारसायकली उघडकीस येण्याची शक्यता आहे.

या गॅरेजमध्ये सुमारे १०० मोटारसायकलीच्या पेट्रोल

जप्त केले आहे. या प्रकरणात गांधी चौक पोलीस ठाण्याचे पोलीस निरीक्षक भातलवंडे, शिवाजी नगर पोलीस ठाण्याचे पोलीस निरीक्षक दिपक लोंढे, एमआयडीसी पोलीस ठाण्याचे सहाय्यक पोलीस निरीक्षक सुधाकर बावकर सोबत पोलीस कर्मचारी संजय फुलारी, अर्जुन राजपूत, सर्जेराव जगताप, प्रशांत भोसले, रामचंद्र ढगे, वहीद शेख, भीमराव बेल्लाळे, दत्ता शिंदे, मधुकर किलावडे, प्रकाश भोसले आदी कर्मचाऱ्यांनी परिश्रम घेऊन या मोटारसायकली जप्त केल्या आहेत. या प्रकरणात गांधी चौक पोलीस